**ठळक बातम्या**

- उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्याबद्दल सी पी राधाकृष्णन यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव

- भारताचा विकास दर यंदा साडेसहा टक्क्याऐवजी ६ पूर्णांक ९ दशांश टक्के राहील असा 'फिच'चा सुधारित अंदाज

- नाशिक जिल्ह्यात शिलापूर इथं तीन राज्यांना लाभ देणाऱ्या, केंद्रीय विद्युत अनुसंधान संस्थानच्या परीक्षण प्रयोगशाळेचं आज उद्घाटन

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताची संयुक्त अरब अमिरातीशी लढत

**<><><><>**

देशाचे १६वे उपराष्ट्रपती म्हणून महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची निवड झाल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह मान्यवरांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे. राधाकृष्णन यांच्या अनेक दशकांच्या अनुभवाचा देशाच्या प्रगतीसाठी फायदा होईल, असं राष्ट्रपती म्हणाल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही राधाकृष्णन यांचं अभिनंदन केलं आहे. रालोआच्या खासदारांनी अतिशय उत्तम उपराष्ट्रपती निवडले आहेत, राधाकृष्णन आपल्या कार्यकाळात उपराष्ट्रपतीपदाच्या प्रतिष्ठेत भर टाकतील असा विश्वास मुख्यमंत्री फडनवीस यांनी व्यक्त केला. महाराष्ट्राचे राज्यपाल असताना राधाकृष्णन यांची निवड उपराष्ट्रपतीपदी होणं ही राज्यातल्या सर्व जनतेसाठी अभिमानाची बाब असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. तर संसदीय परंपरा अधिक सक्षम करण्यासाठी, संविधानिक मूल्यांचं रक्षण करण्यासाठी आणि लोकशाही बळकट करण्यासाठी राधाकृष्णन यांच्या अनुभवाचा देशाला निश्चितच लाभ होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

उपराष्ट्रपतीपदासाठी काल झालेल्या निवडणुकीत राधाकृष्णन यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी, इंडिया आघाडीचे उमेदवार न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांचा १५२ मतांनी पराभव केला. राधाकृष्णन यांना ४५२, तर रेड्डी यांना ३०० मतं मिळाली.

देशातल्या दुसऱ्या सर्वोच्च संवैधानिक पदावर झालेली आपली निवड हा राष्ट्रवादी विचारसरणीचा विजय असल्याचा भावना राधाकृष्णन यांनी विजयानंतरच्या भाषणात व्यक्त केली. २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी काम करण्यासाठी कटीबद्ध असल्याचं ते म्हणाले. लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष दोन्ही महत्त्वाचे आहेत, लोकशाहीचं हित लक्षात ठेवलं जाईल, असंही राधाकृष्णन म्हणाले.

**<><><><>**

भारत आणि अमेरिका हे नैसर्गिक भागीदार असून एकमेकांचे जवळचे मित्र आहेत, असं मत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं आहे. दोन्ही देशांमध्ये व्यापार विषयक चर्चेतून विलक्षण संधीचं दार उघडलं जाणार आहे. दोन्ही देशांची शिष्टमंडळं या क्षेत्रात परस्पर सहमतीच्या जवळ पोहोचण्यासाठी काम करत आहेत, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या समाजमाध्यमावरल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. उज्वल आणि समृद्ध भविष्यासाठी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळण्याची अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली असून आपण लवकरच ट्रम्प यांच्याबरोबर चर्चा करणार असल्याचेही त्यांनी म्हटलं आहे.

त्याआधी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीद्वारे आपण संवाद साधणार असून दोन्ही देशांमधील चर्चा यशस्वी होण्यात काही अडचण येईल असं आपल्याला वाटत नसल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं होतं.

**<><><><>**

फिच या जागतिक पतमापन संस्थेनं चालू आर्थिक वर्षासाठी भारताच्या विकास दराचा अंदाज साडेसहा टक्क्यावरून वाढवून ६ पूर्णांक ९ दशांश टक्के केला आहे. देशांतर्गत मागणी, वाढता ग्राहक खर्च आणि त्याला पूरक आर्थिक परिस्थिती, यांमुळे आधीच्या अंदाजात सुधारणा केल्याचं फिचनं आपल्या अहवालात म्हटलं आहे. भारताने केलेल्या जीएसटीमधल्या सुधारणांमुळे भारतीय कंपन्यांना लाभ होईल, खरेदीला चालना

मिळेल आणि त्यामुळे, अमेरिकेनं लादलेल्या अतिरिक्त करवाढीमुळे निर्यात मागणी धोक्यात आली असूनही भारताची आर्थिक वाढ चांगली राहील, अशी अपेक्षा फिचनं व्यक्त केली आहे.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं नुकत्याच केलेल्या फेररचनेमुळे अनेक वस्तूंवरच्या जीएसटी करात बदल झाला आहे. ऐकूया त्याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**- - होल्ड व्हॉईस कास्ट- -**

*(अन्न, औषधं, शेतीविषयक सामग्री, मत्स्योत्पादन अशा विविध घटकांसह अन्य अनेक क्षेत्रांमध्ये जीएसटी दरात कपात करण्यात आली आहे. बांधकाम क्षेत्रासाठी लागणारे संगमरवर, ग्रॅनाईटसारखे दगड, बांबूपासून बनणाऱ्या फरश्या, विविध प्रकारचे गालिचे, रजया यांवरचा जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. घर सजावटीसाठी लागणारं लाकडी साहित्य, सुशोभनाच्या वस्तू, लाकडी आणि दगडी मूर्ती, फोटोफ्रेम्स, आरसे, पॅकिंगसाठी लागणारं साहित्य, मेणबत्त्या तसंच विविध प्रकारचं हस्तकला साहित्य, मोती आणि प्रवाळ यांवरचा करही १२ टक्क्यावरून ५ टक्के इतका करण्यात आला आहे. बांधकाम आणि गृहनिर्मितीसाठी लागणाऱ्या विविध प्रकारची सिमेंट, वातानुकूलित यंत्र यावरचा जीएसटी २८ टक्क्यांवरून १८ टक्के करण्यात आला आहे. बायोगॅस, सौर उपकरणं, पवनचक्की अशा विविध उर्जा निर्मितीसाठी लागणाऱ्या साहित्यावरचा करही १२ टक्क्यावरून ५ टक्के करण्यात आला आहे. बायोडिझेल, कोळसा आणि तत्सम इंधन घटक यांवरचा जीएसटी मात्र १२ टक्क्यांवरून १८ टक्के इतका वाढवण्यात आला आहे.)*

**<><><><>**

नाशिक तालुक्यातल्या शिलापूर इथं उभारण्यात आलेल्या केंद्रीय विद्युत अनुसंधान संस्थानच्या परीक्षण प्रयोगशाळा म्हणजेच सी पी आर आय चं उद्घाटन आज केंद्रीय उर्जा मंत्री मनोहरलाल खट्टर यांच्या हस्ते, तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थिती होत आहे. शंभर एकर क्षेत्रात साकारलेली ही प्रयोगशाळा महाराष्ट्रच नव्हे तर गुजरात आणि राजस्थान या तीन राज्यातल्या उद्योजकांना उपयुक्त ठरणार असल्याचं अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ म्हणाले.

<><><><>

पीयूसी प्रमाणपत्र नसलेल्या वाहनांना इंधन न देण्याचा निर्णय राज्य सरकार लवकरच घेणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज मुंबईत घेतलेल्या बैठकीत ही माहिती दिली. राज्यातल्या प्रत्येक पेट्रोल पंपावर सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे इंधन भरण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक वाहनाचा वाहन क्रमांक तपासला जाईल. त्यानुसार वाहनाच्या पीयूसी वैधता कळेल. पीयूसी संपलेल्या वाहनांना पेट्रोल पंपावर उपलब्ध सुविधेतून पीयुसी काढता येईल आणि त्यानंतर इंधन भरता येईल, अशी यंत्रणा राबवण्याचा सरकारचा विचार आहे. भविष्यात वाहन विक्री करणारी आणि दुरुस्ती करणाऱ्या दुकानांमध्ये पीयुसी देण्याची व्यवस्था केली जाणार आहे. अवैध पद्धतीने पीयूसी देणाऱ्या टोळींविरोधात धडक मोहीम राबवण्याचे आदेशही सरनाईक यांनी दिले.

<><><><>

राज्यातला शेतकरी अतिवृष्टीमुळे उद्ध्वस्त झाला असून निराशेच्या भरात आत्महत्या करत आहे. परंतु महायुती सरकारला त्याच्याशी काहीही देणंघेणं नाही, अशी टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी समाजमाध्यमाद्वारे केली आहे.

महायुती सरकारनं सत्तेत येण्यासाठी शेतकऱ्यांना कर्ज माफीचं आश्वासन दिलं होतं, मात्र या आश्वासनाची पूर्तता न झाल्यानं गेल्या आठ महिन्यांत १ हजार १८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून जीवन संपवल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

<><><><>

महाराष्ट्र जनसुरक्षा कायद्याविरोधात महाविकास आघाडीतर्फे आज राज्यात विविध ठिकाणी आंदोलन केलं जात आहे.

**बीड**मध्ये महाविकास आघाडीनं जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. त्यात आमदार संदीप क्षीरसागर सहभागी झाले होते. हा कायदा घटनाविरोधी असून लोकशाहीला बाधक असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

**छत्रपती संभाजीनगर**च्या क्रांती चौकात महाविकास आघाडीनं आंदोलन केलं. सरकारनं या आंदोलनाची गंभीर दखल घ्यावी अन्यथा हे आंदोलन अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

**नागपूर** शहरातल्या व्हरायटी चौकातही महाविकास आघाडीनं आंदोलन केलं.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१० सप्टेंबर २०२५ - बुधवार

**<><><><>**

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊ नये आणि शासनानं काढलेला हैदराबाद गॅझेटिअरचा जीआर रद्द करावा या मागणीसाठी बीड जिल्ह्यात केज तालुक्यामध्ये आज ओबीसी समाजानं तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. शासन निर्णय रद्द झाला नाही तर मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा ओबीसींचे नेते सुभाष राऊत यांनी दिला आहे.

**<><><><>**

नौदलाच्या जवानाची दिशाभूल करुन त्यांची बंदूक आणि काडतूस पळवून नेल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी दोन भावांना अटक केली आहे. तेलंगाणातल्या असिफाबादमधून ही अटक करण्यात आली. दोघांपैकी एक जण अग्नीवीर आहे. शनिवारी रात्री दोघांपैकी एकानं कर्तव्यावर असणाऱ्या जवानाची दिशाभूल करुन त्याची बंदूक आणि काडतूस घेतली होती. या दोघांना मुंबईत आणलं जातंय.

**<><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा पहिला सामना आज दुबईत संयुक्त अरब अमिरातीशी होणार आहे.

या स्पर्धेत काल झालेल्या पहिल्या सामन्यात अफगाणिस्ताननं हाँगकाँगवर ९४ धावांनी विजय मिळवला. अफगाणिस्ताननं प्रथम फलंदाजी करताना ६ बळीच्या बदल्यात १८८ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना हाँगकाँगच्या संघाला ९४ धावांपर्यंतच मजल मारता आली.

येत्या २८ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणाऱ्या या स्पर्धेच्या अ गटात भारत, पाकिस्तान, ओमान आणि यूएईचा समावेश आहे. तर ब गटात श्रीलंका, अफगाणिस्तान, हाँगकाँग आणि बांगलादेश यांचा समावेश आहे.

**//<><><><>//**